NUTA BULLETIN
OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION
Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2012-2014
YEAR : 37) 15th May 2012 : ( No. of pages - 12) ( No : 04

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO) : Affiliated to the AIFUCTO**
**Vidyapeeth Vidyarthi Bhavan, B-Road, Churchgate, Mumbai 400 020.**

# महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या गुरुवार, दिनांक १० मे, २०१२ रोजी जळगाव येथे झालेल्या बैठकीत सकाळच्या सत्रात संमत झालेला आंदोलनाबाबतची महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची भूमिका स्पष्ट करणारा ठराव क्रमांक १

(१.१) महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या शिष्टमंडळाशी मा. उच्च शिक्षणमंत्री यांनी दिनांक २५ एप्रिल २०१२ रोजी व त्यानंतर दिनांक २ मे २०१२ रोजी अनेक तास चर्चा केली. २ मे २०१२ रोजी मा. उच्च शिक्षणमंत्र्यानी मा. मुख्यमंत्र्याशी सुद्धा १ तासभर चर्चा घडवून आणली. चर्चा खूपच सकारात्मक होत असली तरी या चर्चेतून काहीहि दस्तऐवज निष्पन्न होत नाही असे आढळून आले आहे. या पार्श्वभूमीवर आंदोलनातील मुख्य विषय काय आहेत? व त्यावरच्या उपाययोजना काय आहेत हे स्पष्टपणे व जाहिरपणे विद्यार्थ्यासमोर, पालकांसमोर तसेच आम जनतेसमोर व मुख्य म्हणजे मा. उच्च शिक्षणमंत्र्यांच्या समोर मांडणे या कार्यकारी मंडळाला आवश्यक वाटते.

### नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत

(१.२) नेट-सेटमुक्त शिक्षकांच्या बाबतीत कारण नसतांना विलंब होण्याचा प्रकार घडत आहे. खरे म्हणजे दिनांक २६ ऑगस्ट, २००९ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तात परिच्छेद ५ मध्ये पुढील प्रमाणे नमुद आहे.:-

"**वेळोवेळी पारित केलेल्या आदेशानुसार, नेट/सेट अर्हतेमधून सूट देण्याचे व नियमित सेवा कधीपासून ग्राह्य धरण्यात यावी, याबाबतचे सर्वातोपरी अधिकार विद्यापीठ अनुदान आयोगास आहेत. याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाचा निर्णय अंतिम राहील.**" त्याच इतिवृत्तामध्ये असेहि स्पष्टपणे ठरलेले आहे की :-

"विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सूट मिळाल्याचे पत्र विद्यापीठास प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून शक्यतो ३० दिवसांच्या आत ती प्रकरणे निकाली काढण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे शिबिरे आयोजित करून कार्यवाही पूर्ण करण्यात येईल."

(१.३) त्यानंतर शासनाच्या उच्च शिक्षण विभागाने दिनांक ७ ऑगस्ट २००९ रोजी एक अतितात्काळ परिपत्रक (क्र.संकीर्ण-२००९/(संप/०९)/ विशि-१) काढून सर्व विद्यापीठांना व महाविद्यालयांना असे आदेशित केले की, :-

"(ii) विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सूट मिळाल्याचे पत्र विद्यापीठास प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून शक्यतो ३० दिवसांच्या आत ती प्रकरणे निकाली काढण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे शिबिर आयोजित करून कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

(iii) **विद्यापीठ अनुदान आयोग जी तारीख नमूद करील, त्या तारखेपासून सूट देण्यात येईल.**"

(१.४) विद्यापीठ अनुदान आयोगाचा अंतिम निर्णय आता झालेला आहे. ऑगस्ट २०११ मध्ये १६ तारखेला व त्यानंतर २६ तारखेला (त्यानंतर १५ मार्च २०१२ लासुद्धा) पत्र पाठवून विद्यापीठ अनुदान आयोगाने आपला अंतिम निर्णय कळविला. तो असा की, "As may be seen from the above decision of the Commission, the commission has taken the said decision in respect of all such appointments made on regular basis by various universities during the period from September 19, 1991 to April 3, 2000. Therefore the services of such teachers **for all purposes should be counted from the date of their regular appointment.** "

(१.५) मा.उच्च शिक्षणमंत्री व मा. उच्च शिक्षण सचिव यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाची भूमिका मनापासून मान्य केली असल्याचे या महासंघाला सांगितले आहे. दिनांक २ मे रोजी मा. मुख्यमंत्र्यांसमक्ष झालेल्या चर्चेच्या वेळी समोर कागदपत्रे नसतांना "एक्झम्शनच्या तारखेपासून सेवा धरावी की नेमणूकीच्या तारखेपासून सेवा धरावी याबाबत लिगल ओपिनियन घ्यावे" असा विषय चर्चेला आला असता मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी "साहेब! आता याबाबतचा प्रवास खुपच पुढे गेलेला आहे. मागे जाण्यात काही अर्थ नाही" अशी भूमिका मांडली. सर्व चर्चा बसून चालली असतांना मा. उच्च शिक्षण सचिव यांनी आपल्या जागेवर उभे राहून चर्चेत सहभागी होत "सर! यावर लिगल ओपिनियन घेऊन झालेले आहे. आता आणखी कोणाचे लीगल ओपिनियन घेणार? विद्यापीठ अनुदान आयोगाने लिगल ओपिनियन घेऊनच आपला अंतिम निर्णय कळविला आहे." असे मा. मुख्यमंत्र्यांच्या लक्षात आणून दिले व मग तो विषय बाजूला पडला हे जाहिरपणे सांगीतले पाहिजे.

(१.६) हे सर्व सांगून झाल्यावर हेसुद्धा सांगितले पाहिजे की मा. उच्च शिक्षणमंत्री व **मा. उच्च शिक्षण सचिव जे बोलतात ते कागदावर उतरविण्यात येणाऱ्या अडचणीवर मात करण्यात त्याना अजून यश आलेले दिसत नाही.**

**आंदोलनाबाबतचा हा विशेषांक महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्षांच्या निदेशानुसार व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या वतीने प्रकाशित करण्यात येत आहे - संपादक**

***''राज्यातील १६-१७ लक्ष कर्मचाऱ्यांना या थकबाकीचे ३ वार्षिक भाग अदा करण्यात आलेले आहेत. व थकबाकीचा चौथा वार्षिक भाग पुढच्या जुलै मध्ये अदा करण्यात येणार आहे..... त्या १६-१७ लाखामध्ये ४ ते ५ लाख अशासकिय अनुदानित विद्यालयातून काम करणाऱ्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांचासुद्धा समावेश आहे..... अशासकिय अनुदानित महाविद्यालयातून २००६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या हजारो प्राध्यापकांनासुद्धा सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारित निवृत्ती वेतनापोटी थकबाकीचे ३ वार्षिक भाग रोखीने मिळाले आहेत व चौथा वार्षिक भाग जुलै २०१२ मध्ये अदा करण्याचा शासननिर्णय यापूर्वीच निर्गमित झालेला आहे. अशासकीय महाविद्यालयातील सेवानिवृत्त प्राध्यापकांना सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी रोखीने देवू, पण सेवारत शिक्षकांना मात्र ती देणार नाही हा मा. उच्च शिक्षणमंत्र्यांचा दुराग्रह अजिबात मान्य होण्यासारखा नाही हे ठामपणे नमुद करण्यात येत आहे.''***

*आंदोलनाबाबतची महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची भूमिका स्पष्ट करणारा ठराव क्रमांक १ मधिल परिच्छेद २.२ पहा*

विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सुट मिळाल्यानंतर २ ते ३ हजाराच्यावर शिक्षकांना नेमणूकीच्या दिनांकापासून सेवा धरुन सर्व वित्तिय लाभ यापूर्वीच मिळालेले आहेत. ११ डिसेंबर १९९९ च्या शासननिर्णयातील तरतुदीप्रमाणे हे लाभ त्यांना सहसंचालकांच्या स्तरावर देण्यात आले असून ११ डिसेंबर १९९९ च्या शासननिर्णयान्वये दिलेले हे लाभ परत घेण्याचे आदेश मा. उच्च न्यायालयाने अनेक प्रकरणामध्ये रद्दबादल ठरविले आहे.

(१.७) सहसंचालक मनात आणतील तर १९९९ च्या शासननिर्णयाप्रमाणे हे लाभ ते देऊ शकतात पण उच्च शिक्षण मंत्री मात्र त्याच शासननिर्णयाप्रमाणे हे लाभ देऊ शकत नाहीत ही अनाकलनीय स्थिती आहे. आणखी वेगळा शासननिर्णय काढायचाच असेल तर याबाबतचा शासननिर्णय तातडीने निर्गमित होणे आवश्यक आहे. "Discussions of the representatives of the Maharashtra Federation of University and College Teachers' Organisation (MFUCTO) with the Hon.Minister for Higher & Technical Education" या मथळ्याचे दिनांक ७ डिसेंबर १९९९ रोजी झालेल्या चर्चेचे कार्यवृत्त पाहिले तर त्या कार्यवृत्तात परिच्छेद ४ हा पुढील प्रमाणे आहे. :- "The Government Orders will be issued by 20th December, 1999."

(१.८) तत्कालीन उच्च शिक्षणमंत्री मा. श्री. दिलीप वळसे पाटील यांनी संपूर्ण "पाचव्या वेतन आयोगाची अम्मलबजावणी करणारा शासननिर्णय २० डिसेंबर १९९९ पर्यंत काढला जाईल" असे महासंघाला लेखी लिहून दिले व प्रत्यक्षात शासननिर्णय ११ डिसेंबर १९९९ रोजी निर्गमित केला. **संपूर्ण पाचवा वेतन आयोग लागू करणारा ३१ परिच्छेदांचा, आठ परिशिष्टांचा व तेरा तक्त्यांचा शासननिर्णय जर पाच दिवसात निर्गमित होतो तर एका परिच्छेदाचा लहानसा नेट-सेटबाबतचा शासननिर्णय ५ दिवसात निर्गमित होण्यास कोणतीही अडचण असता कामा नये.**

(१.९) मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी या सर्व बाबी पूर्वीच मान्य केलेल्या असल्यामुळे नेट-सेटमुक्त शिक्षकांच्या बाबतीत पुढील सहमती होणे आवश्यक आहे. :-

(१) याबाबतचा शासननिर्णय पुढील ५ ते ७ दिवसात निर्गमित करण्यात यावा.

(२) विद्यापीठे व सहसंचालक यांची संयुक्त बैठक होवून स्थाननिश्चिती व वेतन निश्चितीचे काम शिबिरांचे आयोजन करुन यापूर्वीच मान्य केल्याप्रमाणे पुढील ३० दिवसात पूर्ण केले जावे.

(३) उपरोक्त १ व २ वरील कारवाई पूर्ण करुन या सर्व शिक्षकांना माहे जुनचे वेतन जुलैमध्ये किंवा उशिरात उशिरा म्हणजे माहे जुलैचे वेतन ऑगस्ट मध्ये सुधारित वेतनाप्रमाणे अदा केले जावे.

(४) वेतनफरकाची रक्कम अदा करण्याची मुदत निश्चित करण्यात यावी.

**सुधारित वेतनश्रेणीची थकबाकी**

(२.१) सुधारित वेतनश्रेणीची थकबाकी विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना अदा करण्याच्या बाबतीत महाराष्ट्र राज्याचे मा. उच्च शिक्षणमंत्री व मा. मुख्य सचिव यांनी दिलेला शब्द पाळला जाणे आवश्यक आहे. शासनाच्या एवढ्या उच्च पदस्थ पदाधिकारी व अधिकारी यांनी दिलेला शब्द पाळला गेला नाही व जात नाही यामुळे उच्च शिक्षण क्षेत्रात तीव्र असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. परवा मा. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत झालेल्या चर्चेच्या वेळी दुदैवाने मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी "केंद्राने अजून नकार कळविला नाही" असे उद्‌गार काढले. त्यावर ताबडतोबच मा. मुख्यमंत्री असे म्हणाले की "ते तुम्हाला

***''केंद्र शासनाने नकार कळविला काय?'' हा वेगळा प्रश्न आहे. आणि ''हे अर्थसहाय्य केंद्र शासनाकडून मिळाले काय?'' हा वेगळा प्रश्न आहे व या दोनही प्रश्नांचे उत्तर 'नाही.' असेच असले तरी उत्तर मिळाल्यानंतरची कृति कोणता प्रश्न विचारला यावर अवलंबून आहे व ती या दोनही प्रश्नांच्या बाबतीत वेगवेगळी आहे. ही गोष्ट महासंघाच्या शिष्टमंडळाने मा. उच्च शिक्षण मंत्र्यांच्या लक्षात आणून दिली आहे. केंद्राचा नकार येईपर्यंत थकबाकी बाबत चकार शब्द बोलायचा नाही असा उभयपक्षी करार नाही, हे मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी लक्षात घ्यायला पाहिजे, दिनांक २६ ऑगस्ट, २००९ रोजी झालेल्या बैठकीत उभयपक्षी स्वाक्षरित झालेल्या मतैक्यपत्रात परिच्छेद १ मध्ये पुढील प्रमाणे उल्लेख आहे.:-''हे अर्थसहाय्य केंद्र शासनाकडून न मिळाल्यास ८० टक्के थकबाकीची रक्कम राज्य शासन, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे देईल.'' हे अर्थसहाय्य केंद्र शासनाकडून मिळाले आहे काय? या प्रश्नाचे उत्तर 'नाही' असे आहे व मग त्यामुळेच त्यापुढची कारवाई अटळ आहे.''***

आंदोलनाबाबतची महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची भूमिका स्पष्ट करणारा ठराव क्रमांक १ मधिल परिच्छेद २.२ पहा

***स्पष्टपणे दिलेला शब्द राज्यकर्ते ज्यावेळी पाळत नाहीत त्यावेळी राज्यकर्त्यांची ती कृती तिव्र असंतोषाच्या निर्मितीची जननी ठरते. राज्य शासनाने दिलेल्या शब्दाचे पालन करावे अशी आमची मा. उच्च शिक्षणमंत्र्यांना विनंती आहे. थकबाकीची रक्कम राज्यशासन राज्य शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे देईल या वचनाची पूर्ती करण्यासाठी :- (१) थकबाकीचा चौथा वार्षिक भाग राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या व अशासकिय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांच्या बरोबर विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना अदा करण्यात यावा व (२) थकबाकीचे अगोदरचे तीन वार्षिक भाग त्यापूर्वी अदा करण्यात यावेत.***

*आंदोलनाबाबतची महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची भूमिका स्पष्ट करणारा ठराव क्रमांक १ मधिल परिच्छेद २.४ पहा*

असा नकार कळविणार नाहीत." "इतर कोणत्याही कर्मचाऱ्यासाठी केंद्र शासनाकडून थकबाकीपोटी १ रुपयाचे अंशदान मिळत नाही, विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या बाबतीत ८० टक्के अंशदान मिळू शकते, हे अंशदान मिळविण्यात शासनाला अपयश आलेले आहे. हा काही शिक्षकांचा दोष नाही" ही गोष्ट महासंघाच्या शिष्टमंडळाने चर्चेच्या वेळी मा. मुख्यमंत्र्यांच्या लक्षात आणून दिली.

(२.२) महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या शिष्टमंडळाने मा. मुख्यमंत्र्यांच्या हेही लक्षात आणून दिले की "राज्यातील १६-१७ लक्ष कर्मचाऱ्यांना या थकबाकीचे ३ वार्षिक भाग अदा करण्यात आलेले आहेत. व थकबाकीचा चौथा वार्षिक भाग पुढच्या जुलै मध्ये अदा करण्यात येणार आहे." त्यावर मा. मुख्यमंत्री असे म्हणाले की **"ते सर्व शासकीय कर्मचारी आहेत."** त्यावर ताबडतोबच महासंघाच्या शिष्टमंडळाने मा. मुख्यमंत्र्यांना असे सांगितले की, **"त्या १६-१७ लाखामध्ये ४ ते ५ लाख अशासकिय अनुदानित विद्यालयातून काम करणाऱ्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांचासुद्धा समावेश आहे."** त्यावर मा. मुख्यमंत्र्यांनी "अशासकीय अनुदानित शाळातील शिक्षकांना जर ही थकबाकी दिली असेल तर ती अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकांना सुद्धा द्यावी लागेल." असे उद्गार काढले. याबाबत विशेष गमतीची गोष्ट अशी आहे की अशासकिय अनुदानित महाविद्यालयातून २००६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या हजारो प्राध्यापकांनासुद्धा सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारित निवृत्ती वेतनापोटी थकबाकीचे ३ वार्षिक भाग रोखीने मिळाले आहेत व चौथा वार्षिक भाग जुलै २०१२ मध्ये अदा करण्याचा शासननिर्णय यापूर्वीच निर्गमित झालेला आहे. **अशासकीय महाविद्यालयातील सेवानिवृत्त प्राध्यापकांना सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी रोखीने देवू, पण सेवारत शिक्षकांना मात्र ती देणार नाही हा मा. उच्च शिक्षणमंत्र्यांचा दुराग्रह अजिबात मान्य होण्यासारखा नाही हे ठामपणे नमुद करण्यात येत आहे.**

(२.३) दुर्देवाने नेमके याच वेळी मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी "विद्यापीठ अनुदान आयोगाने अजून नकार कळविला नाही" असे उद्गार काढल्यानंतर या प्रश्नावरील चर्चेची गाडी रुळावरुन घसरली ती पून्हा रुळावर आलीच नाही. **"केंद्र शासनाने नकार कळविला काय?"** हा वेगळा प्रश्न आहे. आणि **"हे अर्थसहाय्य केंद्र शासनाकडून मिळाले काय?"** हा वेगळा प्रश्न आहे व या दोनही प्रश्नांचे उत्तर '**नाही.**' असेच असले तरी उत्तर मिळाल्यानंतरची कृति कोणता प्रश्न विचारला यावर अवलंबून आहे व ती या दोनही प्रश्नांच्या बाबतीत वेगवेगळी आहे. ही गोष्ट महासंघाच्या शिष्टमंडळाने मा. उच्च शिक्षण मंत्र्यांच्या लक्षात आणून दिली आहे. केंद्राचा नकार येईपर्यंत थकबाकी बाबत चकार शब्द बोलायचा नाही असा उभयपक्षी करार नाही, हे मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी लक्षात घ्यायला पाहिजे, दिनांक २६ ऑगस्ट, २००९ रोजी झालेल्या बैठकीत उभयपक्षी स्वाक्षरित झालेल्या मतैक्यपत्रात परिच्छेद १ मध्ये पुढील प्रमाणे उल्लेख आहे.:-

"हे अर्थसहाय्य केंद्र शासनाकडून **न मिळाल्यास ८० टक्के थकबाकीची रक्कम राज्य शासन, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे देईल."** हे अर्थसहाय्य केंद्र शासनाकडून मिळाले आहे काय? या प्रश्नाचे उत्तर '**नाही**' असे आहे व मग त्यामुळेच त्यापुढची कारवाई अटळ आहे.

(२.४) स्पष्टपणे दिलेला शब्द राज्यकर्ते ज्यावेळी पाळत नाहीत त्यावेळी राज्यकर्त्यांची ती कृती तिव्र असंतोषाच्या निर्मितीची जननी ठरते. राज्य शासनाने दिलेल्या शब्दाचे पालन करावे अशी आमची मा. उच्च शिक्षणमंत्र्यांना विनंती आहे. थकबाकीची रक्कम राज्यशासन राज्य शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे देईल या वचनाची पूर्ती करण्यासाठी :-

(१) थकबाकीचा चौथा वार्षिक भाग राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या व अशासकिय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांच्या बरोबर विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना अदा करण्यात यावा व

(२) थकबाकीचे अगोदरचे तीन वार्षिक भाग त्यापूर्वी अदा करण्यात यावेत.

**दहा महिन्याची थकबाकी रोखीने देण्याची शिळी कढी**

(३.१) एकदा आंदोलन सुरु झाल्यावर फक्त मतैक्य पत्रासाठीच चर्चा होते किंवा होवू शकते. पण आंदोलन सुरु होण्यापूर्वी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना बोलाविणे, त्यांच्याशी चर्चा करणे, प्रस्तावित मसुदा त्यांना दाखविणे, आपल्या मसुद्यात काही चुका असतील तर त्याबाबतचे त्यांचे म्हणणे ऐकून घेणे, संघटनेचे पदाधिकारी दाखवितात त्या चुका खरोखरच आपल्या मसुद्यात असतील तर त्याप्रमाणे आपला मसुदा दुरुस्त करणे, **परिणामी बिनचूक असा शासननिर्णय बाहेर पडणे ही प्रक्रियाच आता उच्च शिक्षण विभागात बंद पडलेली आहे.** शिवाय आम्ही करतो ते शंभर टक्के बरोबर आहे हा उच्च शिक्षण विभागातील काही मध्यस्तरीय अधिकाऱ्यांचा अहंकार पदाधिकाऱ्यांशी चर्चा करण्याची जुनी प्रथा चालू ठेवली तर दुखाविला जातो. या अहंकाराच्या पोटीच १९ एप्रिल २०१२ च्या शासननिर्णयाचा जन्म झालेला आहे. एकाबाबतीत मंत्रीमंडळाच्या व वित्तविभागाच्या सम्मतीने शासननिर्णय सन २००९ मध्येच निर्गमित झालेला आहे याची आठवण सुद्धा न रहाण्याचा हास्यास्पद प्रकार या शासननिर्णयात अंतर्भूत आहे.

(३.२) सन २००९ मध्ये "Revision of pay Scales of teachers and equivalent cadres in Higher Education as per UGC Scheme (6th Pay commission) Universities, Affiliated Colleges, Government Colleges/ Institutes of Science etc." या मथळ्याचा व "GOVERNMENT OF MAHARASHTRA Higher & Technical Education Department, Resolution No. NGC 2009/(243/09)-UNI-1, Mantralaya Annex, Mumbai 400 032. Date: 12th August 2009" या क्रमांकाचा व दिनांकाचा शासननिर्णय निर्गमित झाला आहे. (यापुढे २००९ चा शासननिर्णय असा उल्लेख) या शासननिर्णयाच्या परिच्छेद १४ मध्ये "This Government Resolution is according to the decision taken by the **State Government** on the scheme forwarded by Government of India by its letter dated 31.12.2008." असा स्पष्ट उल्लेख आहे. त्याच शासननिर्णयाच्या परिच्छेद १४ मध्ये असाही उल्लेख आहे की, **"These orders issue with the concurrence of the Finance Department vide their unofficial reference No.395/ SER.9, dated 10-08-2009"** याचा सरळ अर्थ असा आहे की, हा शासननिर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर निर्गमित झाला आहे. तर मग या शासननिर्णयाची दोन अडीच वर्षे अम्मलबजावणी का होत नाही? अशी प्रदिर्घ झोप घेणारे अधिकारी आंदोलन सुरु झाल्यानंतरच चार महिन्यांनी का जागे होतात?

(३.३) प्रत्यक्षात फेब्रुवारी २०१० पासून सुधारित वेतन मिळणे सुरु झाले असले तरी १ एप्रिल २००९ पासून तर ३१ जानेवारी २०१० या काळातील फरक रोखीने द्यावयाचा आहे. अशी स्पष्ट तरतुद २००९ च्या शासननिर्णयातच

***नेट-सेटमुक्त शिक्षकांच्या बाबतीत कारण नसतांना विलंब होण्याचा प्रकार घडत आहे. खरे म्हणजे दिनांक २६ ऑगस्ट, २००९ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तात परिच्छेद ५ मध्ये पुढील प्रमाणे नमुद आहे.:- ''वेळोवेळी पारित केलेल्या आदेशानुसार, नेट/सेट अर्हतेमधून सूट देण्याचे व नियमित सेवा कधीपासून ग्राह्य धरण्यात यावी, याबाबतचे सर्वतोपरी अधिकार विद्यापीठ अनुदान आयोगास आहेत. याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाचा निर्णय अंतिम राहील.'' त्याच इतिवृत्तामध्ये असेहि स्पष्टपणे ठरलेले आहे की :- ''विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सूट मिळाल्याचे पत्र विद्यापीठास प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून शक्यतो ३० दिवसांच्या आत ती प्रकरणे निकाली काढण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे शिबिरे आयोजित करून कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.''***

*आंदोलनाबाबतची महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची भूमिका स्पष्ट करणारा ठराव क्रमांक १ मधिल परिच्छेद १.२ पहा*

आहे. ती पुढील प्रमाणे :-

"**Pay in the revised pay structure is payable in cash from 1st day of April 2009.**" वित्त विभागाची मान्यता झाली, मंत्रिमंडळाची मान्यता झाली, शासननिर्णयात स्पष्टपणे १ एप्रिल २००९ पासून सुधारित वेतन रोखीने द्यावे असे नमुद असतांना गेल्या ३२ महिन्यात हा फरक का अदा करण्यात आला नाही? हा खरा प्रश्न आहे? शासननिर्णयाची अम्मलबजावणी करणे ही उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांची जबाबदारी नाही काय?

(३.४) सन २००९ च्या शासननिर्णयाप्रमाणे एप्रिल २००९ ते जानेवारी २०१० अशी १० महिन्याची थकबाकी रोखीने देण्याबाबतचे आदेश ३२ महिन्यापूर्वी निर्गमित झालेले असतांना आंदोलन सुरु झाल्यानंतर चार महिन्यांनी उच्च शिक्षण विभागातील विद्वान अधिकाऱ्यांनी आता १९ एप्रिल २०१२ ला जो शासननिर्णय काढला त्याच्या परिच्छेद तीन मधील तरतुद पुढील प्रमाणे :-

"३. शिक्षकांना दि. १.४.२००९ते दि. ३१.१.२०१० या कालावधीत रोखीने देय रक्कम. एकूण खर्च रु. ५२२.४० कोटी, त्यातील रु. १०४.४८ कोटी (२० टक्के) राज्य शासनाकडून देय आहे. **त्यापैकी माहे फेब्रुवारी आणि मार्च २०१० या कालावधीतील वेतन फरकाची रक्कम रोखीने देण्यासाठी शासनाने रु. ८७.०६ कोटी एवढी रक्कम यापूर्वीच अदा केली असून** राज्य शासनाच्या हिश्याची उर्वरीत रक्कम या आदेशाव्दारे देण्यात येत आहे." असे नमुद करुन पुढे या कामासाठी १७.४२ कोटी रुपयाची तरतुद स्तंभ ३ मध्ये नमुद केलेली आहे.

(३.५) आता निघालेला १९ एप्रिल २०१२ चा हा शासननिर्णय काळजीपूर्वक पाहिला तर त्याच्या परिच्छेद ३ मध्ये १.४.२००९ ते ३१ जानेवारी २०१० या कालावधीची रक्कम ५२२.४० कोटी रुपये दाखविली असून त्यापैकी फक्त २० टक्के म्हणजे १०४.४८ कोटी रुपये राज्य शासनाला द्यावयाचे आहेत असे दाखविले आहे. वस्तुतः हे २००९ च्या शासननिर्णयाच्या विरोधात आहे कारण, त्या शासननिर्णयात स्पष्टपणे "**Pay in the revised pay structure is payable in cash from 1st day of April 2009.**" अशी तरतुद आहे. आता २० टक्के म्हणून जी १०४.४० कोटीची रक्कम १.४.२००९ ते ३१ जानेवारी २०१० या कालखंडासाठी देण्याचे जे चुकीचे व २००९ च्या शासन निर्णयाच्या विरोधात जाणारे गणित २०१२ च्या शासननिर्णयात मांडले त्यात सुद्धा "**त्यापैकी फेब्रुवारी व मार्च २०१० या कालावधीतील वेतन फरकाची ८७.०६ कोटी रुपयाची रक्कम शासनाने अदा केली असल्याने १०४.४८ कोटीमधून कापून घेतली आहे.**" म्हणजे (१०४.४८ - ८७.०६) = १७.४२ कोटी रुपयाची तरतुद १९ एप्रिल २०१२ च्या या शासन निर्णयात करण्यात आली आहे. **असे करतांना फेब्रुवारी व मार्च २०१० हे दोन महिने १ एप्रिल २००९ ते ३१ जानेवारी २०१० या कालखंडाचा भाग म्हणून या शासननिर्णयाद्वारे जाहिर करण्याची जी अलौकीक कामगीरी उच्च शिक्षण विभागाच्या विद्वान अधिकाऱ्यांनी पार पाडली त्याबद्दल कोणत्याही कॅलेंडरच्या पंचागकर्त्यांनी या अधिकाऱ्यांचा करावा तेवढा गौरव थोडाच आहे.**

(३.६) वित्त विभागाची सहमती झाली, मंत्रिमंडळाची मान्यता झाली, २००९ चा शासननिर्णय निघाला, त्यामध्ये १ एप्रिल २००९ पासून पुढील १० महिन्याच्या फरकाची रक्कम रोखीने द्यावी अशी तरतुद त्या शासननिर्णयातच आहे. तेव्हा ती पुढील १० दिवसात देण्याचा निर्णय घेण्यात यावा.

**सुधारित महागाई भत्त्याला विलंब लावण्याचे 'गारुड'**

***तत्कालीन उच्च शिक्षणमंत्री मा. श्री. दिलीप वळसे पाटील यांनी संपूर्ण ''पाचव्या वेतन आयोगाची अम्मलबजावणी करणारा शासननिर्णय २० डिसेंबर १९९९ पर्यंत काढला जाईल'' असे महासंघाला लेखी लिहून दिले व प्रत्यक्षात शासननिर्णय ११ डिसेंबर १९९९ रोजी निर्गमित केला. संपूर्ण पाचवा वेतन आयोग लागू करणारा ३१ परिच्छेदांचा, आठ परिशिष्टांचा व तेरा तक्त्यांचा शासननिर्णय जर पाच दिवसात निर्गमित होतो तर एका परिच्छेदाचा लहानसा नेट-सेटबाबतचा शासननिर्णय ५ दिवसात निर्गमित होण्यास कोणतीही अडचण असता कामा नये. मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी या सर्व बाबी पूर्वीच मान्य केलेल्या असल्यामुळे नेट-सेटमुक्त शिक्षकांच्या बाबतीत पुढील सहमती होणे आवश्यक आहे. :- (१) याबाबतचा शासननिर्णय पुढील ५ ते ७ दिवसात निर्गमित करण्यात यावा. (२) विद्यापीठे व सहसंचालक यांची संयुक्त बैठक होवून स्थाननिश्चिती व वेतन निश्चितीचे काम शिबिरांचे आयोजन करुन यापूर्वीच मान्य केल्याप्रमाणे पुढील ३० दिवसात पूर्ण केले जावे. (३) उपरोक्त १ व २ वरील कारवाई पूर्ण करुन या सर्व शिक्षकांना माहे जुनचे वेतन जुलैमध्ये किंवा उशिरात उशिरा म्हणजे माहे जुलैचे वेतन ऑगस्ट मध्ये सुधारित वेतनाप्रमाणे अदा केले जावे. (४) वेतनफरकाची रक्कम अदा करण्याची मुदत निश्चित करण्यात यावी.***

*आंदोलनाबाबतची महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची भूमिका स्पष्ट करणारा ठराव क्रमांक १ मधिल परिच्छेद १.८ व १.९ पहा*

***विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सुट मिळाल्यानंतर २ ते ३ हजाराच्यावर शिक्षकांना नेमणूकीच्या दिनांकापासून सेवा धरुन सर्व वित्तिय लाभ यापूर्वीच मिळालेले आहेत. ११ डिसेंबर १९९९ च्या शासननिर्णयातील तरतुदीप्रमाणे हे लाभ त्यांना सहसंचालकांच्या स्तरावर देण्यात आले असून ११ डिसेंबर १९९९ च्या शासननिर्णयान्वये दिलेले हे लाभ परत घेण्याचे आदेश मा. उच्च न्यायालयाने अनेक प्रकरणामध्ये रद्दबादल ठरविले आहे. सहसंचालक मनात आणतील तर १९९९ च्या शासननिर्णयाप्रमाणे हे लाभ ते देऊ शकतात पण उच्च शिक्षण मंत्री मात्र त्याच शासननिर्णयाप्रमाणे हे लाभ देऊ शकत नाहीत ही अनाकलनीय स्थिती आहे.***

*आंदोलनाबाबतची महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची भूमिका स्पष्ट करणारा ठराव क्रमांक १ मधिल परिच्छेद १.६ व १.७ पहा*

(४.१) १९ एप्रिल २०१२ चा हा शासननिर्णय निघाल्यावर मा. उच्च शिक्षणमंत्री यांनी टी.व्ही.वर मुलाखत देवून अत्यंत आनंदाने "**आम्ही आता शासन निर्णय काढला आहे. प्राध्यापकांच्या बहुतांशी मागण्या आता मान्य झालेल्या आहेत. त्यांनी आता आंदोलन मागे घ्यावे**" असे सांगावे याचे या कार्यकारी मंडळाला अत्यंत दुःख होते. मा. उच्च शिश्रणमंत्र्यांनी १९ एप्रिलचा हा शासननिर्णय काळजीपूर्वक मुळातून वाचला तर त्याची हास्यास्पदता त्यांच्या निश्चितपणे लक्षात येईल. वर्षातून २ वेळा सुधारित महागाई भत्ता लागू करतांना थोडाफार 'स्वविवेकाचा' वापर करण्याची संधी इतर विभागांना उपलब्ध होती. ती गेल्या ५-१० वर्षापासून वित्त विभागाने पूर्णपणे बंद करुन टाकली. आंदोलनाचे निमित्त करुन वाढीव महागाई भत्ता देण्याच्या बाबीचा उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी आपण काहीतरी केले आहे ते दाखविण्यासाठी मोठ्या खुबीने १९ एप्रिल २००९ च्या शासननिर्णयात वापर करुन घेतला आहे ही गोष्ट मा. उच्च शिक्षण मंत्र्यांच्या व त्यांच्यामार्फत आम जनतेच्या लक्षात आणून देणे या कार्यकारी मंडळाला आपले कर्तव्य वाटते.

(४.२) दर वर्षाच्या जानेवारी महिन्याच्या १ तारखेला व १ जुलैला अखिल भारतीय पातळीवर महागाई निर्देशांकामध्ये झालेली वाढ लक्षात घेऊन केंद्र शासनाच्या वतीने महागाई भत्त्यामध्ये वाढ केली जाते. **केंद्र शासनाने केलेली महागाई भत्त्यातील वाढ राज्य शासकीय कर्मचारी व अन्य पात्र कर्मचाऱ्यांना लागू करण्याचा धोरणात्मक निर्णय महाराष्ट्रात झालेला असून फार पूर्वी याबाबतचा मुळ शासननिर्णय महाराष्ट्र शासनाचा वित्त विभाग काढत असे** व त्यानंतर मग शालेय शिक्षण विभाग, उच्च शिक्षण विभाग, ग्रामिण विकास विभाग, नगरविकास विभाग इत्यादी विभाग आपआपल्या अखत्यारितील कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्रपणे तीच गोष्ट लागू करणारे वेगवेगळे शासननिर्णय काढीत असत. यामध्ये त्या त्या विभागात मागे पुढे शासननिर्णय काढण्याच्या कामी काही अजब प्रकार होतात हे लक्षात आल्यावर व सभागृहातसुद्धा त्याबाबत बराच संघर्ष झाल्यावर शासनाने ती पद्धती बंद केली व नवीन पद्धती सुरु केली.

(४.३) गेल्या ५-१० वर्षापासून वर्षातून २ वेळा महागाई भत्त्याच्या वाढी अदा करण्यासाठी शासनाने अंगिकारलेल्या नवीन पद्धती प्रमाणे त्याबाबतचा शासननिर्णय सर्व शासकीय कर्मचाऱ्यांसाठी व इतर पात्र कर्मचाऱ्यांसाठी फक्त वित्त विभागाने काढलेला असतो. अशा प्रत्येक शासननिर्णयात पुढील प्रमाणे ठरलेली वाक्य रचना असते. "राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र पूर्णकालिक कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्याच्या दरात सुधारणा करण्याचा प्रश्न" व याच शासननिर्णयात पुढे प्रत्येक वेळी "**सदर आदेश सुधारित वेतन संरचनेत वेतन अनुज्ञेय असलेल्या संस्थांमधील कर्मचाऱ्यांना योग्य त्या फेरफारासह लागू राहतील.**" अशी तरतुद असते. शासनाने वेळोवेळी परिपत्रके व आदेश काढून हे स्पष्ट केले आहे की "**वित्त विभागामार्फत वाढीव महागाई भत्त्याचे आदेश निर्गमित करतांना शासकीय कर्मचारी व इतर पात्र कर्मचारी असा उल्लेख असतो. इतर पात्र कर्मचाऱ्यांमध्ये राज्यातील मान्यताप्राप्त अनुदानित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा अंतर्भाव होतो.**" शासनातर्फे वारंवार हेही स्पष्ट करण्यात आलेले आहे की, "**महागाई भत्ता लागू करण्यासाठी स्वतंत्रपणे पुन्हा आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता नाही.**"

(४.४) फक्त वित्त विभागानेच शासन निर्णय काढावा, असे ठरल्याने आपापल्या पातळीवर वेगळा शासननिर्णय काढण्याचे इतर विभागांचे अधिकार संपुष्टात आलेत व तसे करतांना थोडीफार "चिरीमिरी" करण्याची संधीसुद्धा पूर्णपणे संपुष्टात आली. याचे मुळ कारण म्हणजे वित्त विभागाने काढलेल्या शासननिर्णयात दरवेळी "यावर होणारा खर्च संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते ज्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात, त्या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून त्याखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. **अनुदानप्राप्त संस्था व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, संबंधित प्रमुख लेखा शीर्षाखालील ज्या उपलेखाशिर्षाखाली त्यांच्या सहाय्यक अनुदानाबाबतचा खर्च खर्ची टाकण्यात येतो, त्या उप लेखाशीर्षाखाली हा खर्च खर्ची टाकण्यात यावा.**" असा स्पष्ट उल्लेख असतो व "**महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंदर्भात विद्यमान तरतुदी व कार्यपद्धती आहे त्याचप्रकारे यापुढेही लागू राहील.**" असेहि वित्त विभागाच्या त्या शासननिर्णयातच दरवेळी नमुद असते.

(४.५) शासनाने एवढ्या मोठ्या प्रमाणावर "**व्यवस्थेत व्यवस्थित बंदोबस्त**" केल्यानंतरसुद्धा शासनाच्या काही विभागात "चिरीमिरी"चे प्रकार सुरुच राहिले. यात सर्वात वरचा क्रम त्या काळांत शालेय शिक्षण विभागाचा होता. वित्त विभागाचा शासननिर्णय निघाल्यावरसुद्धा काही क्षेत्रिय अधिकारी "**तो शासननिर्णय निघाला तरी वाढलेला महागाई भत्ता केंव्हापासून लागू करायचा हे आमच्या हाती आहे.**" असे भासवित असत. त्यांच्या या अपप्रकाराला वरिष्ठ अधिकाऱ्यांचा पाठिंबा असल्याशिवाय त्यांच्यामध्ये ती हिम्मत येत नव्हती हे उघडच आहे. मग क्षेत्रीय स्तरावर आंदोलने व्हायची, नंतर कृपावंत होवून हे अधिकारी वाढलेला महागाई भत्ता लागू करत. हा प्रकार बरेच दिवस चालू होता. तो प्रकार असह्य व्हायला लागल्यावर त्याबाबत अनेक शिक्षकांनी व संघटनांनी तक्रारी केल्या. विधानमंडळातील एका चांगल्या संघर्षानंतर या रोगराईचा बंदोबस्त झाला असे दिसून येते.

(४.६) सन २००८ च्या तिसऱ्या अधिवेशनामध्ये "**वाढीव महागाई भत्ता विलंबाने लागू करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक ४६२३० हा बुधवार, दिनांक २४ डिसेंबर २००८ च्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये पहिल्याच क्रमांकावर समाविष्ट होता. "दरवेळी महागाई भत्ता वाढ देतांना "**प्रत्येक विभागाने स्वतंत्रपणे शासन आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता रहाणार नाही मंजूर अनुदानातूनच तो खर्च करावा**" असे शासनाचे स्पष्ट आदेश असतांना दरवेळी महागाई भत्ता विलंबाने लागू करणाऱ्या शालेय शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या अमरावती जिल्हा कार्याध्यक्षांनी दिनांक २३ ऑगस्ट, २००८ रोजी किंवा त्या दरम्यान मा.सचिव, शालेय शिक्षण विभाग यांचेकडे शिक्षणाधिकारी (माध्य.) अमरावती, यांच्यामार्फत एक निवेदन पाठवून केलेली आहे, हे खरे आहे काय," या प्रश्न भाग १ ला मा. शालेय शिक्षण मंत्र्यांनी एका शब्दात "होय" असे उत्तर दिले होते.

(४.७) उपरोक्त ४६२३० या तारांकित प्रश्नाचा भाग तीन पुढील प्रमाणे होता. "**पुरवणी मागणी मान्य झाल्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत थकीत देयके देऊ नये**" असे आदेश (क्रमांकःअमाशा/२००७-०८ वाढीव म.भ./१५ क ४) शिक्षण संचालकांनी दिनांक ६ ऑक्टोबर, २००७ रोजी काढले व बरीच आंदोलने झाल्यानंतर त्याच शिक्षण संचालकांनी दिनांक १२ जून, २००८ रोजी आदेश (क्रमांक अशामा/०८-०९/वाढीव म.भ./१५ क ४) काढून "**वरील परिस्थितीचा विचार करता वेगळी तरतुद उपलब्ध झालेली नसली तरी मुळ मंजूर तरतुदीतून वाढीव महागाई खर्च करण्याची परवानगी दिली**" ही गोष्ट खरी आहे काय," या प्रश्नाला दिलेल्या उत्तरामध्ये सुद्धा शासनाने ती वस्तुस्थिती असल्याचे मान्य केले होते.

(४.८) उपरोक्त प्रश्नावरील अनुपुरक चर्चेमध्ये पहिल्याच उप प्रश्नाला मा. शालेय शिक्षण मंत्र्यांनी पुढील प्रमाणे उत्तर दिले. :-

"**डॉ. पतंगराव कदम : महोदय, हे खरे आहे की, विभागातील काही लोकांनी ही चूक केली आहे. परंतु शासनाने यासंबंधीचे कालच स्पष्ट असे**

**आदेश काढलेले आहेत की अशा प्रकारे पुन्हा आदेश काढण्याची आवश्यकता नाही. ज्यावेळेस सरकारी कर्मचाऱ्यांबाबतचा निर्णय होतो त्याच वेळेस शिक्षकांना सुध्दा महागाई भत्त्याची रक्कम देण्यात यावी."**

या प्रश्नावरील अनुपुरक चर्चेचा शेवट मा. शालेय शिक्षणमंत्र्यांच्या पुढील उत्तराने झाला. :-

"**डॉ. पतंगराव कदम :** सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख तसेच सन्माननीय सदस्य श्री. खोटरे यांनी जे प्रश्न या ठिकाणी उपस्थित केलेले आहेत त्यासंदर्भात आदेश काढण्यात आलेले असून **ज्या अधिकाऱ्यांनी यासंदर्भात चुका केल्या असतील त्यांची निश्चितपणे चौकशी करण्यात येईल."**

(४.९) सभागृहामध्ये बुधवार, दिनांक २४ डिसेंबर २००८ रोजी मा. शालेय शिक्षणमंत्री उत्तर देत होते व या प्रकाराचा बंदोबस्त करणारे कडक आदेश (क्रमांक : शिकाना २००८(५७/०८)/माशि-२ दिनांक २३ डिसेंबर, २००८) त्यांनी एक दिवस अगोदर काढले होते. तसे त्यांनी सभागृहात चर्चेच्या वेळी सांगितले. त्या आदेशात स्पष्टपणे असे नमुद होते की, "**वित्त विभागामार्फत वाढीव महागाई भत्त्याचे आदेश निर्गमित करतांना शासकीय कर्मचारी व इतर पात्र कर्मचारी असा उल्लेख करतात.** इतर पात्र कर्मचाऱ्यांमध्ये राज्यातील मान्यताप्राप्त अनुदानित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा अंतर्भाव होतो.......**महागाई भत्ता लागू करण्यासाठी स्वतंत्रपणे पुन्हा आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता नाही.**" या आदेशाच्या परिच्छेद ३ मध्ये स्पष्टपणे पुढील प्रमाणे तरतुद आहे. :-

"**अर्थसंकल्पीय अंदाज शासनास सादर करतांना, दोन वाढीव महागाई भत्त्याची अंदाजीत रक्कम वार्षिक वेतनवाढ गृहित धरुन चालू वर्षापेक्षा साधारणतः २० टक्के वेतनावरील वाढीव खर्च दर्शविणे अपेक्षित आहे. असा खर्च दर्शविल्यास राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसोबतच पात्र शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वाढीव महागाई भत्ता वित्त विभागाच्या शासन निर्णयात नमूद केलेल्या महिन्यात देता येवू शकतो.**"

(४.१०) २३ डिसेंबर २००८ च्या आदेशाच्या परिच्छेद ५ मध्ये शिक्षण संचालकांना असे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत की :-

"राज्य शासनामार्फत यापुढे देय होणारा वाढीव महागाई भत्ता पात्र शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना देतांना तो नियमित तरतुदीतूनच शासन निर्णयात नमूद केलेल्या महिन्यात देण्याबाबत सर्व संबंधित अधिकाऱ्यांना निदेश देण्यात यावेत."

त्याच आदेशात शेवटी परिच्छेद ६ मध्ये स्पष्टपणे गंभीर स्वरुपाच्या कारवाईचा इषारा पुढील शब्दात देण्यात आलेला आहे. :-

**"वाढीव महागाई भत्ता विहीत महिन्यात अदा न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्याविरुध्द गंभीर स्वरुपाची कार्यवाही करण्यात येईल, याबाबतही सर्व संबंधितांना कृपया जाणिव करुन देण्यात यावी."**

(४.११) महागाई भत्ता वाढ देतांना शालेय शिक्षण विभागात घुसलेल्या 'चिरीमिरी'च्या महामारीने त्यावेळी घातलेल्या थैमानाचे एवढे तपशीलवार वर्णन देतांना **महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाला हे जाहिरपणे नमुद केले पाहिजे की सन २०११ चा अपवाद सोडला तर तत्पूर्वीच्या ५-१० वर्षात उच्च शिक्षण विभागात चिरी मिरीची ही महामारी कधीही दिसून आली नाही.** पण तिकडे शालेय शिक्षण विभागातून या महामारीचे उच्चाटन झालेले असतांना सन २०११ मध्ये मात्र महागाई भत्ता विलंबाने देण्याच्या या महामारीचे थैमान उच्च शिक्षण विभागात जोराने सुरु झाले असे दिसून येते. प्राध्यापकांचे आंदोलन सुरु झाल्यावर आपण काहीतरी करीत आहोत हे दाखविण्यासाठी उच्च शिक्षण विभागाने १९ एप्रिल २०१२ रोजी जो हास्यास्पद शासननिर्णय काढला त्याच्या परिच्छेद ५ मध्ये "दि. १.५.२०११ पासून दि. ३०.९.२०११ पर्यंत ६ टक्के महागाई भत्याच्या वाढीची रक्कम (माहे ऑक्टोबर २०११ ते मार्च २०१२ या कालावधीतील रक्कम अदा करण्यात आली असून उर्वरीत माहे मे ते सप्टेंबर २०११ या कालावधीतील रक्कम या आदेशाव्दारे देण्यात येत आहे.)" अशी मोठी साळसुद तरतुद करण्यात आली आहे व त्यासाठी ३८ कोटी रुपयाची तरतुद दाखविण्यात आली आहे. **अनुदानीत अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांना मात्र शासकीय कर्मचाऱ्यांसोबतच ही वाढ पहिल्या महिन्यापासून दिल्यामुळे या शासननिर्णयात तरतुद "निरंक" दाखविली आहे.**

(४.१२) खरे म्हणजे १ मे २०११ पासून वाढलेला ६ टक्के महागाई भत्ता (४५ टक्क्यावरुन ५१ टक्के) महाराष्ट्रातील सर्व शासकीय कर्मचारी व इतर पात्र पूर्णकालीक कर्मचाऱ्यांना (सर्व स्तरावरचे शिक्षक धरून) २६ एप्रिल २०११ च्या आदेशाने (शासन निर्णय क्रमांक मभवा-१११११/प्र.क्र.६४/सेवा-९) लागू झालेला आहे. "१ मे २०११ पासून तो रोखीने द्यावा" हे त्या आदेशातच नमुद आहे. वित्त विभागाचा हा शासननिर्णय उच्च शिक्षण विभागाला लागू आहे असेहि त्या आदेशातच आहे. त्या आदेशात असेहि नमुद आहे की "महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंदर्भातील विद्यमान तरतुदी व कार्यपद्धती आहे त्याचप्रकारे यापुढेही लागू राहतील."...... "यावर होणारा खर्च 'संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते' ज्या लेखा शीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात त्या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून त्याखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. **अनुदानप्राप्त संस्था व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या वाबतीत, संबंधित प्रमुख लेखा शीर्षाखालील ज्या उप लेखा शिर्षाखाली त्यांच्या सहाय्यक अनुदानाबाबतचा खर्च खर्ची टाकण्यात येतो, त्या उप लेखा शीर्षाखाली हा खर्च खर्ची टाकण्यात यावा.**"

(४.१३) सदर १९ एप्रिल २०१२ च्या हास्यास्पद शासननिर्णयाच्या परिच्छेद ६ मध्ये "माहे ऑक्टो.२०११ ते फेब्रु.२०१२ या कालावधीतील ७ टक्के महागाई भत्याची रक्कम" या मथळ्याखाली तरतुद करण्यात आली असून "अशासकीय अनुदानीत महाविद्यालये (कला, वाणिज्य, विज्ञान व विधी)" यासाठी ४४.८१ कोटी रुपयाची तरतुद करण्यात आल्याचे दाखविले असून "अनुदानीत अध्यापक महाविद्यालये"साठी तरतुद निरंक करण्यात आली आहे.

खरी गोष्ट अशी आहे की "अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर ५१ टक्क्यांवरुन ५८ टक्के करण्यात यावा. सदर महागाई भत्त्याच्या वाढीची रक्कम रोखीने देण्यात यावी." असे स्पष्ट आदेश शासन निर्णय क्रमांक मभवा-१११११/प्र.क्र.६४/सेवा- ९ अन्वये वित्त विभागाने दिनांक ४ ऑक्टोबर २०११ रोजी काढले असून त्याच्या परिच्छेद ३ मध्ये "महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंदर्भातील विद्यमान तरतुदी व कार्यपद्धती आहे त्याच प्रकारे यापुढेही लागू राहतील." असे नमुद केले आहे व त्याच शासननिर्णयाच्या परिच्छेद ५ मध्ये "अनुदानप्राप्त संस्था व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या वाबतीत, संबंधित प्रमुख लेखा शीर्षाखालील ज्या उप लेखा शिर्षाखाली त्यांच्या सहाय्यक अनुदानाबाबतचा खर्च खर्ची टाकण्यात येतो, त्या उप लेखा शीर्षाखाली हा खर्च खर्ची टाकण्यात यावा." असेहि स्पष्टपणे नमुद केले आहे.

(४.१४) खरे म्हणजे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने आंदोलन सुरु करतांना दिलेल्या निवेदनात व मागणीपत्रांत महागाई भत्ता विलंबाने लागू केल्याबद्दल तक्रार नव्हती व ती थकबाकी द्यावी अशी मागणीही नव्हती. पण तरीही १९ एप्रिल २०१२ च्या हास्यास्पद शासननिर्णयामध्ये "सन २०११-१२ या आर्थिक वर्षामध्ये लागू करण्यात आलेल्या ६ टक्के आणि ७ टक्के महागाई भत्याच्या फरकाची रक्कम ....... अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे." अशी तरतुद टाकून उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी कालचक्र उलटे फिरविण्याचा जो प्रयत्न या शासननिर्णयातून केलेला आहे त्याचा तिव्र निषेध करण्यात येत आहे.

(४.१५) "शासन असे आदेश देत आहे की, दिनांक १ मे २०११ पासून सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतनावरील (वेतनबँडमधील वेतन अधिक ग्रेड वेतन) अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर **४५ टक्क्यांवरुन ५१ टक्के करण्यात यावा. सदर महागाई भत्त्याच्या वाढीची रक्कम रोखीने देण्यात यावी.**" असा आदेश (क्रमांक मभवा-१११११/प्र.क्र.६४/सेवा- ९) **एकदा वित्त विभागाने** दिनांक २६ एप्रिल २०११ रोजी काढल्यानंतर व त्याच वर्षात "शासन असे आदेश देत आहे की, दिनांक १ ऑक्टोबर २०११ पासून सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतनावरील (वेतनबँडमधील वेतन अधिक ग्रेड वेतन) अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर **५१ टक्क्यांवरुन ५८ टक्के करण्यात यावा. सदर महागाई भत्त्याच्या वाढीची रक्कम रोखीने देण्यात यावी.**" असा आदेश ४ ऑक्टोबर २०११ रोजी काढल्यानंतर १९ एप्रिल २०१२ च्या उच्च शिक्षण विभागाच्या शासननिर्णयामध्ये परिच्छेद ६ व ७ वर ज्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत त्यातून त्या शासननिर्णयातील हास्यास्पदता, अधोरेखीत करणारे पुढील प्रश्न आता निर्माण झाले आहेत.

(१) महागाई भत्त्याची वाढ वित्त विभागाच्या एकाच शासननिर्णयाने उच्च शिक्षण विभागासह सर्व सरकारी कर्मचारी व अनुदानित संस्थामधील सर्व पात्र कर्मचारी यांना लागू होत असतांना, त्यासाठी वेगळे शासननिर्णय काढण्याची गरज नसतांना, **विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना वेगळा शासननिर्णय काढून "विशेष सन्मानजनक वागणूक" देण्याचा अधिकार उच्च शिक्षण विभागातील आधिकाऱ्यांना कोणी दिला?**

(२) अशासकिय अनुदानित अध्यापक महाविद्यालयातील प्राध्यापकांना शासकीय कर्मचाऱ्यांना लागू होईल त्या तारखेपासून वाढीव महागाई भत्ता आम्ही देवू, मात्र

अशासकिय अनुदानित कला, वाणिज्य विज्ञान व विधी महाविद्यालयातील प्राध्यापकांना आम्हाला वाटेल तेवढ्या उशिराने आम्ही वाढीव महागाई भत्ता लागू करू. ही जी वस्तुस्थिती १९ एप्रिल २०१२ च्या हास्यास्पद शासननिर्णयाने पुढे आलेली आहे, **त्यात अंतर्भूत असलेली भेदभावपूर्ण कृति करण्याचा अधिकार उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांना कोणी बहाल केलेला आहे.?**

(३) १ मे २०११ पासून वाढीव महागाई भत्ता वित्त विभागाच्या २६ एप्रिल २०११ च्या आदेशाने लागू करण्यात आला. सर्व विभागांनी "१ मे पासून तो रोखीने द्यावा" असे त्या शासननिर्णयात स्पष्टपणे नमुद असतांना त्याप्रमाणे "माहे ऑक्टोबर २०११ ते मार्च २०१२ या कालावधीतील रक्कम अदा करण्यात आली" हे या १९ एप्रिल २०१२ च्या शासननिर्णयात नमुद असून त्याच शासननिर्णयात "माहे मे ते सप्टेंबर २०११ या कालावधीतील रक्कम आता या आदेशाव्दारे देण्यात येत आहे." अशी कबुली त्याच शासननिर्णयात दिलेली आहे. याचा अर्थ वित्त विभागाने जरी शासन निर्णय काढला तरी आम्हाला वाटले म्हणून आम्ही ऑक्टोबर २०११ पासूनचा वाढीव महागाई भत्ता रोखीने दिला. मे, २०११ चा वाढीव महागाई भत्ता आम्ही बारा महिने विलंबाने देऊ. म्हणजे काय? तर वाटते तेवढ्या विलंबाने आम्ही वाढीव महागाई भत्ता लागू करू, **अशा एका नव्या कालखंडाची सुरुवात करण्याचा उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचा हा निर्णय कोणत्या शासननिर्णयावर आधारित आहे?**

(४.१६) वाढीव महागाई भत्ता वित्त विभागाच्या एकाच शासननिर्णयाने शासकिय कर्मचाऱ्यांना अनुदानित संस्थातील पात्र कर्मचाऱ्यांना एकाच तारखेपासून लागू होत असतांना त्यासाठी वेगळा शासननिर्णय काढण्याची गरज नसतांना "मंजूर अनुदानातूनच तो खर्च भागवावा" "अनुदानप्राप्त संस्था व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, संबंधित प्रमुख लेखा शीर्षाखालील ज्या उप लेखा शिर्षाखाली त्यांच्या सहाय्यक अनुदानाबाबतचा खर्च खर्ची टाकण्यात येतो, त्या उप लेखा शिर्षाखाली हा खर्च खर्ची टाकण्यात यावा" अशी वित्त विभागाच्या शासननिर्णयामध्ये स्पष्ट तरतुद असतांना, **उच्च शिक्षण विभागामध्ये सन २०११ मध्ये वित्त विभागाच्या या शासननिर्णयांची अवहेलना करण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करावी व त्यावर योग्य ती कारवाई करावी व यापूढे असा प्रकार घडणार नाही याबाबतचे सक्त आदेश निर्गमित करावे अशी मागणी करण्यात येत आहे.**

(५.१) महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने १५ जानेवारी २०१२ रोजी जळगाव येथे झालेल्या बैठकीत आंदोलनाचा ठराव सम्मत केला होता. संघटनेच्या अध्यक्ष व सचिवांनी १८ जानेवारी २०१२ रोजी राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांना व उच्च शिक्षण मंत्र्यांना याबाबतचे सविस्तर निवेदन स्वतः दिले व निवेदन मिळाल्याची पोचपावती दोनही कार्यालयातून प्राप्त केली. प्रत्यक्ष आंदोलन सुरु होईपर्यंत याबाबत कोणतीही चर्चा घडून आली नाही हे अत्यंत दुदैवी व दुःखद होय. २५ एप्रिल २०१२ रोजी याबाबत चर्चेची पहिली बैठक झाली. अनेक तास चर्चा झाली पण त्यातून यापूर्वीच ठाम शब्दात दिलेल्या आश्वासनांच्या मुदतबंद पूर्तीचा कोणताही दस्तऐवज निप्पन्न झाला नाही.

(५.२) सन २००९ च्या आंदोलनाच्या वेळी एकतर्फी पत्र संघटनेवर थोपवण्याचा सपाटा त्यावेळच्या सचिवांनी लावला होता. एकतर्फी पत्र लिहायचे, ते प्रसिद्धीला द्यायचे, त्यानंतर त्या पत्रातील दोषपूर्ण कृतीचे महाराष्ट्रभर वाभाडे निघायचे, पहिल्या पत्रातील दोष दुरुस्त करण्यासाठी दुसरे पत्र दिले जायचे, त्यात दुप्पट चुका असायच्या मग पून्हा तिसरे पत्र दिले जाई. सुदैवाने यावेळी एकतर्फी पत्र पाठविण्याच्या मार्गाचा वापर करण्यास मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी विभागाला मनाई केलेली दिसते हे योग्यच होय.

(५.३) आंदोलन सुरु होण्यापूर्वी एखादा शासननिर्णय काढणे ही वेगळी गोष्ट आहे पण आंदोलन सुरु झाल्यानंतर १९ एप्रिल २०१२ च्या शासननिर्णयासारखा हास्यास्पद शासननिर्णय निर्गमित होणे हे अत्यंत अयोग्य होय. अशा एकतर्फी दोषपूर्ण शासननिर्णयाने अनेकदा आंदोलकांच्या मनात तीव्र असंतोष निर्माण होतो पण १९ एप्रिलच्या शासननिर्णयाने तसे न होता महाराष्ट्रभर त्या निर्णयातील हास्यास्पदता हा करमणूकीचा विषय झालेला आहे.

(५.४) मा. उच्च शिक्षणमंत्र्यांच्या पुढाकाराने ज्या बैठका झाल्यात त्यातील प्रत्येक बैठकीची, बैठक सुरु होण्यापूर्वी कोणतीही तयारी विभागाने केलेली नसते. तत्कालीन मा. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २३ एप्रिल १९७७ रोजी, १५ जुलै १९७७ व त्यानंतर २२ ऑगस्ट १९७७ या तीन तारखांना महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाबरोबर बैठका झाल्या. त्यावेळी चर्चा होवून जी तीन मतैक्यपत्रे नोंदविण्यात आलीत त्याचे दस्तऐवज आजही संघटनेच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. या प्रत्येक बैठकीची तयारी म्हणून तत्कालीन शिक्षण सचिव श्री.द.म.सुखटणकर जी टिप्पणी तयार ठेवत असत तीचे आजही अवलोकन केले म्हणजे "सचिवालयातील 'ती' माणसे गेली कुठे?" असे वाटल्यावाचून रहात नाही.

(५.५) या प्रत्येक बैठकीसाठी श्री.द.म.सुखटणकर यांचेकडून जी टिप्पणी तयार केली जात असे त्यात मुख्यत्वे पुढील बाबी असत. (१) चर्चेसाठी विषय किंवा मुद्दा काय आहे? जसे "आकृतीबंधामुळे अतिरिक्त झालेल्या शिक्षकांचा प्रश्न" त्यानंतर (२) याबाबत संघटनेचे म्हणणे काय आहे? टिप्पणी शासनाची असली तरी या मथळ्याखाली संघटनेच्या निवेदनातून काढून संघटनेचे म्हणणे काय आहे हे इमानेइतबारे मांडलेले असे. त्यानंतर (३) या प्रश्नाबाबत शासनाची भूमिका काय आहे हे मांडलेले असायचे. त्यानंतर (४) उपाययोजना काय आहेत? यावर काय केले पाहिजे? याविषयीच्या एकापेक्षा जास्त पर्यायी उपाययोजना नमुद केलेल्या असत. संघटनेला किंवा शासनाला अत्यंत आवडणारा किंवा अजिबात न आवडणारा पर्यायसुद्धा तेथे नमूद असे. चर्चा केल्यावर त्यातील कोणत्या उपायाबाबत एकमत झाले एवढेच नमुद केले जात असे त्यामुळे चटकन निर्णय होत असे. मान्य झालेला पर्याय सुखटणकरांच्या टिप्पणीत नव्हता असे फार क्वचित होत असे.

(५.६) २ मे २०१२ रोजी अनेक तासांची चर्चा झाली पण दस्तऐवज काहीही निप्पन्न झाला नाही. ३ तारखेला दुपारी संघटनेच्या कार्यालयात महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाची बैठक चालू असतांना भर बैठकीत संघटनेच्या अध्यक्षांना मंत्रालयातून एका अधिकाऱ्याचा फोन आला. "कालच्या बैठकीचे कार्यवृत्त माझ्याजवळ येथे आहे. त्याची प्रत मिळणार नाही. तुम्ही येथे या व पाहून घ्या. काय करेक्शन करायचे असेल ते करा. ते मी मा. मंत्रिमहोदयांना कळविन. मी प्रत आपल्याला देवू शकणार नाही कारण तसे मला आदेश आहेत." कार्यकारी मंडळाचे सारे सदस्य ऐकत होते. अध्यक्षांनी सर्वासमक्ष फोनवरून त्या अधिकाऱ्याला सुनावले "मी तिथे येवून करेक्शन करण्याचा हा प्रश्न नाही. ती प्रत आम्हाला मिळत असल्यास कार्यकारी मंडळातच त्याबाबत निर्णय होवू शकतो. आता प्रत न देण्याचेच आदेश तुम्हाला आहेत ,असे म्हणता तर प्रत मिळाल्याशिवाय मला पुढे काहीही करता येणार नाही. हा माझा निरोप आपण मंत्रिमहोदयांना सांगा".

(५.७) दहा मिनिटांनी बैठक चालु असतांना खुद्द मा. उच्च शिक्षणमंत्र्यांचा अध्यक्षांना बैठकीतच फोन आला. "दहा मिनिटामध्ये प्रत तुम्हाला देण्यासाठी मी सांगितले आहे." दहा मिनिटांनी बैठक सुरु असतांनाच ती प्रत आली. त्याच्या सोबत कोणतेही पत्र नाही. त्यावर कोणाची स्वाक्षरी नाही. एका पांढऱ्या स्वच्छ कागदावर लहान लहान चार पाच परिच्छेद असलेला तो कागद. अस्वाक्षरीत प्रतीवर चर्चा करणे कार्यकारी मंडळास योग्य वाटले नाही. अस्वाक्षरित प्रतीला अस्वाक्षरीत उत्तर पाठविण्याची एक कल्पना चर्चिली गेली. अस्वाक्षरित प्रतींची देवाणघेवाण म्हणजे कोणतीही जबाबदारी न घेता उभयबाजूंनी केलेली केवळ शब्दांची आदळआपट होईल असा विचार करुन कार्यकारी मंडळाने तो विषय तेथेच संपविला.

(५.८) आपण मुख्यसचिवांना सोबत घेऊन दिलेले शब्द आपल्याला पाळता येतील, याची मंत्रालयातील सर्व प्रक्रीया पार पाडून महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाला चर्चेसाठी बोलवावे अशी मा. उच्च शिक्षणमंत्र्यांना आमची विनंती आहे. त्यासाठी चर्चा करणाऱ्या शिष्टमंडळाची नियुक्ती या कार्यकारी मंडळाने यापूर्वीच केलेली आहे. चर्चेनंतर जो दस्तऐवज मा. उच्च शिक्षण मंत्री उपलब्ध करुन देतील त्या आधारावर या कार्यकारी मंडळातच याबाबत निर्णय घेतला जाईल.

(५.९) ३२ महिन्यापूर्वी शासनाच्या उच्च स्तरावरून दिलेला शब्द अम्मलबजावणीच्या प्रयोजनार्थ कागदोपत्री उतरविण्यात मा. उच्च शिक्षण मंत्र्यांना येत असलेल्या अडचणी लक्षात घेता मा. मुख्यमंत्र्यांनी व उपमुख्यमंत्र्यांनी उच्च शिक्षण मंत्र्यांसमवेत उच्च स्तरीय बैठक बोलावून विषयोक्त मुद्यांवर निर्णय करावेत व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळावे अशी विनंती करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

(५.१०) उच्च शिक्षण खात्याकडून या बाबतीत होत असलेला विलंब लक्षात घेता आंदोलन आणखी तीव्र करण्याचा भाग म्हणून राज्यभर संघटनेतर्फे विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या सभांचे आयोजन करुन त्यांना हा विषय जाहिरपणे समजावून सांगण्याच्या कार्यक्रमाला पुढील आठवड्यापासून सुरुवात केली जाईल. असाही निर्णय घेण्यात येत आहे.

**Prof. Shivajirao Patil**
(President)

**Dr.S.P.Lawande**
(Joint Secretary)

## *पहिले कार्यवृत्त व दुसरे कार्यवृत्त ही "दोन्ही कार्यवृत्ते उच्च शिक्षण विभागाने एकतर्फी तयार केलेली असुन ती उभय पक्षी स्वाक्षरीत झालेली नाहीत हे सुरुवातीलाच स्पष्ट करण्यात येत आहे."*

*आंदोलनाबाबतची महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची भूमिका स्पष्ट करणारा ठराव क्रमांक २ मधिल परिच्छेद २ पहा*

पहिले कार्यवृत्त

मसुदा

# उच्च व तंत्रशिक्षण विभाग / विशि - १

## मा. मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण) यांच्याकडे दि. २५.४.२०१२ रोजी एमफुक्टो या शिक्षक संघटनेसमवेत झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त

सदर बैठकीस खालील अधिकारी / पदाधिकारी उपस्थित होते :-
१) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
२) प्रा. बी. टी. देशमुख, माजी वि.प.स.
३) संचालक, उच्च शिक्षण, पुणे
४) श्री. विकास कदम, कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग
५) प्रा. शिवाजीराव पाटील, अध्यक्ष, एमफुक्टो
६) श्रीमती ताप्ती मुखोपाध्याय, महासचिव, एमफुक्टो
७) एमफुक्टो संघटनेचे इतर पदाधिकारी

२. संघटनेचे पदाधिकारी व मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्यामध्ये सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले :-

१) अकृषि विद्यापीठे व महाविद्यालयातील शिक्षकांना दि. १२ ऑगस्ट २००९ च्या शासन निर्णयान्वये सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन संरचना लागू करण्यात आली. सदर शासन निर्णय मंत्रिमंडळाच्या मान्यतेने निर्गमित करण्यात आला असून या शासन निर्णयातील परि. क्र. २ (९) (ii) मध्ये दि. १ एप्रिल, २००९ पासून रोखीने सुधारित वेतन देण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

उक्त दि. १२ ऑगस्ट, २००९ च्या शासन निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी माहे फेब्रुवारी, २०१० पासून करण्यात आली. त्यामुळे १ एप्रिल, २००९ ते ३१ जानेवारी, २०१० या कालावधीतील फरकाची रक्कम १०० टक्के रोखीने देणे आवश्यक आहे. **त्यानुसार सूधारित प्रस्ताव ७ दिवसांत वित्त विभागास सादर करुन त्याचा पाठपुरावा करण्यात येईल. वित्त विभागाच्या मान्यतेनंतर आवश्यक तो शासन निर्णय त्वरित निर्गमित करण्यात येईल.**

२) दि. १९ सप्टेंबर, १९९१ ते ३ एप्रिल, २००० या कालावधीतील बिगर नेट-सेट अध्यापकांच्या संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. १६.८.२०११, २६.०८.२०११ व दि. १५.०३.२०१२ च्या पत्रान्वये दिलेले निर्देश विचारात घेवून सदर **अध्यापकांच्या सेवा नियुक्तीच्या दिनांकापासून ग्राह्य धरुन अनुषंगीक लाभ देण्याबाबत वित्त विभागाची मान्यता घेतल्यानंतर योग्य ते आदेश निर्गमित करण्यात येतील सदर कार्यवाही लवकरात लवकर करण्यात येईल.**

३) वर नमूद मुद्या क्रमांक - २ मधील निर्णयाच्या अनुषंगाने आवश्यक त्या मान्यता प्राप्त करुन **शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर सदर आदेशाची अंमलबजावणी** करण्यासाठी सर्व अकृषि विद्यापीठे व सर्व विभागीय सहसंचालकांनी यासंदर्भात विद्यापीठांमध्ये एकत्रित शिबिर आयोजित करुन ३० दिवसात सर्व शिक्षकांची स्थाननिश्चिती व वेतननिश्चिती करावी.

४) वरीलप्रमाणे स्थाननिश्चिती व वेतन निश्चिती केल्यानंतर लाभार्थींना **कोणतीही थकबाकी अनुज्ञेय राहणार नाही**.

५) यापूर्वी एमफुक्टो संघटनेसोबत दि. २६ ऑगस्ट, २००९ रोजी बैठक झाली. सदर बैठकीमध्ये सहाव्यावेतन आयोगाच्या अतिरिक्त खर्चाच्या ८० टक्के रक्कम केन्द्र शासनाकडून प्राप्त न झाल्यास सदर रक्कम राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे राज्य शासनाकडून देण्यात येईल असा निर्णय घेण्यात आला आहे.

सुधारित वेतन आयोगानुसार अतिरिक्त खर्चाच्या ८० टक्के रक्कमेची प्रतिपूर्ती करण्याचाप्रस्ताव केन्द्र शासनाकडे सादर करण्यात आला असून सदर प्रस्ताव अद्याप मंजूर झालेला नाही. यासंदर्भात केन्द्र शासनाकडे उच्च स्तरावरुन पाठपुरावा करुन सदर रक्कम प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत. दरम्यान दि. २६ ऑगस्ट, २००९ च्या बैठकीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने ८० टक्के रक्कमेचा पहिला हप्ता (२० टक्के) मंजूर करण्याचा आवश्यक **तो प्रस्ताव वित्त विभागास १५ दिवसांत सादर करुन त्याचा पाठपुरावा करण्यात येईल. वित्त विभागाच्या मान्यतेनंतर आवश्यक तो शासन निर्णय त्वरित निर्गमित करण्यात येईल.**

६) वरील सर्व बाबी विचारात घेता एमफुक्टो संघटनेने सुरु केलेले आंदोलन व उत्तरपत्रिका मुल्यांकनाच्या कामावर घातलेला बहिष्कार त्वरीत मागे घ्यावा.

स्वाक्षरी - संजय कुमार

आंदोलनाबाबतची महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची भूमिका स्पष्ट करणारा ठराव क्रमांक २ परिच्छेद १ पहा

दुसरे कार्यवृत्त

# उच्च व तंत्रशिक्षण विभाग/विशि-१

## मा. मुख्यमंत्री यांच्या कडे दि. २.५.२०१२ रोजी एमफुक्टो या शिक्षकसंघटनेसमवेत झालेल्या बैठकीचे कार्यवृत..

सदर बैठकीत खालील अधिकारी/पदाधिकारी उपस्थित होते

(१) प्रधान सचिव, वित्त विभाग.

(२) प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग

(३) श्री. सदाशिव शिवदास, सहसचिव, उच्च व तंत्रशिक्षण

(४) श्री. विक्रम काळे, वि.प.स

(५) प्रा. बी. टी देशमुख, माजी वि.प.स.

(६) डॉ. पी. आर. गायकवाड, संचालक, उच्च शिक्षण पुणे

(७) श्री. विकास कदम,कक्षअधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग

(८) प्रा. शिवाजीराव पाटील, अध्यक्ष, एम फुक्टो

(९) श्रीमती तापती मुखोपाध्याय, महासचिव, एम फुक्टो

(१०) एम फुक्टो संघटनेचे इतर पदाधिकारी.

२. मा. मुख्यमंत्री, मा. मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण), मा. राज्यमंत्री (उ.व तंशी) व संघटनेचे पदाधिकारी यांच्या मध्ये सविस्तर चर्चा होवुन खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.-

१. अकृषि विद्यापीठे व महाविद्यालयातील शिक्षकांना दि. १२ ऑगस्ट, २००९ च्या शासन निर्णयान्वये सहाव्यावेतन आयोगानुसार सुधारीत वेतन संरचना लागु करण्यात आली. सदर शासन निर्णय मंत्रीमंडळाच्या मान्यतेने निर्गमित करण्यात आला असुन या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.2(9)(ii) मध्ये दि. १ एप्रिल,२००९ पासुन रोखीने सुधारीत वेतन देण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

उक्त दि. १२ ऑगस्ट, २००९ च्या शासन निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी माहे फेब्रवारी, २०१० पासुन करण्यात आली. त्यामुळे १ एप्रिल,२००९ ते ३१ जानेवारी, २०१० या कालावधीतील फरकाची रक्कम १०० टक्के रोखीने देणे आवयक आहे. **ती दोन हप्त्यात देण्याचे ठरले.**

२. दि. १९ सप्टेंबर, १९९१ ते ३ एप्रिल २००० या कालावधीतील बिगर नेट-सेट अध्यापकाच्या संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. १६/०८/२०११, २६/०८/२०११ व दि १५/०३/२०१२ च्या पत्रान्वये दिलेले निदेश विचारात घेवुन सदर अध्यापकांच्या सेवा नियुक्तीच्या दिनांकापासुन सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्याचे निदेश दिले आहेत. **या संदर्भात मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) व प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांची विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष डॉ. वेदप्रकाश यांचेशी दुरध्वनीवरुन चर्चा झाली.** सदर चर्चेमध्ये डॉ. वेदप्रकाश यांनी, आयोगाने दिलेली सुट हि संबंधित विद्यापीठानी बिगर नेट-सेट अध्यापकांना नियमीत नेमणुक देते वेळी दिलेल्या सुटीच्या दिनांकापासुन देण्यात आल्याचे नमुद करुन अशा प्रकारे विद्यापीठांनी बिगर नेट-सेट अध्यापकांना नियमीत नेमणुक देते वेळी दिलेल्या सुटीच्या दिनांकापासुन सेवा नियमीत करुन सदर सेवा नियमीतीकरण हे सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरावयाचे असल्याचा निर्णय आयोगाने घेतलेला असल्याचा आयोगाच्या दि. १५/०३/२०१२ च्या पत्राचा अन्वयार्थ स्पष्ट केला. सदर बाब अशीच स्विकृत करावयाचे ठरले. **तथापि हे मत आयोगाकडुन लेखी सहमतीत करुन घेण्याचे ही बैठकीत ठरले.** त्याप्रमाणे आयोगास तात्काळ पत्र निर्गमित करावे. उपरोक्त कालावधीतील अध्यापकांच्या सेवा आयोगाकडुन वरील प्रमाणे सहमती प्राप्त होण्याच्या अधिन सर्व प्रयोजनार्थ नियमित नियुक्तीच्या दिनांकापासुन ग्राह्य धरण्याचे ठरले. **याबाबतचा शासन निर्णय निर्गमित झाल्या नंतर उक्त अध्यापकांना दिनांक ११/१२/९९९ व दि. १२/०८/२००९ रोजी च्याशासन निर्णयातील तरतदी विचारात घेवुन त्याची स्थाननिश्चिती व वेतननिश्चिती करण्यात यावी.**

३. वरील प्रमाणे स्थाननिश्चिती व वेतननिश्चिती केल्यानंतर लाभार्थींना देय होणाऱ्या थकबाकी संबंधीत मंत्रीमंडळास्तरावर निर्णय घेण्यात येईल.

४. सुधारीत वेतन आयोगानुसार अतिरीक्त खर्चाच्या ८० टक्के प्रतिपुर्ती करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्यात आला असुन **सदर प्रस्ताव अद्याप मंजुर झालेला नाही.** यासंदर्भात केंद्र शासनाकडे मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या स्तरावरुन पाठपुरावा करुन सदर रक्कम प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील व तद्नंतर पुढील निर्णय घेण्यात येईल.

५. वरील सर्व निर्णय विचारात घेता एमफुक्टो संघटनेने सुरु केलेले आंदोलन व उत्तरपत्रिका मुल्यांकनाच्या कामावर बहिष्कार त्वरीत मागे घ्यावा.

***महाराष्ट्र शासन : बैठक : २०१२/(११०/१२) विशि-१***

***उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२***

**दिनांक : ९ मे, २०१२.**

प्रति,

श्री. शिवाजीराव पाटील, अध्यक्ष, एमफुक्टो,

शिवाई, ३९ रेऊ नगर, ढेकू रोड अमळनेर जि. जळगांव

पिन कोड : ४२५ ४०१

श्री. विक्रम काळे, विधान परिषद सदस्य

श्री. बी. टी. देशमुख, माजी विधान परिषद सदस्य.

**विषय :** एमफुक्टो संघटनेच्या विविध मागण्यांबाबत मा. मुख्यमंत्री यांच्याकडे झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त.

महोदय,

मा. मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक २ मे, २०१२ रोजी एमफुक्टो या शिक्षक संघटनेची बैठक झाली. सदर बैठकीचे कार्यवृत्त माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

आपला,

**(विकास तु. कदम)**

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :- मा. मुख्यमंत्री यांचे खासगी सचिव, संचालक, उच्चशिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे, मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, प्रधान सचिव, (वित्त) यांचे स्वीय सहायक, प्रधान सचिव, (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे स्वीय सहायक, सहसचिव (मशि) यांचे स्वीय सहायक, उपसचिव (विशि) यांचे स्वीय सहायक, निवड नस्ती.

आंदोलनाबाबतची महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची भूमिका स्पष्ट करणारा ठराव क्रमांक २ परिच्छेद १ पहा

MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS
(MFUCTO) : Affiliated to the AIFUCTO
Vidyapeeth Vidyarthi Bhavan, B-Road, Churchgate, Mumbai 400 020.

# महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या गुरुवार, दिनांक १० मे, २०१२ रोजी जळगाव येथे झालेल्या बैठकीत सकाळच्या सत्रात संमत झालेला आंदोलनाबाबतची महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची भूमिका स्पष्ट करणारा ठराव क्रमांक २

ठराव क्रमांक १ संमत करण्यात आल्यानंतर मुंबई येथे दि. ९ मे २०१२ रोजी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाधिन केलेल्या २ मे २०१२ रोजीच्या बैठकीच्या एकतर्फी कार्यवृत्ताची उपलब्ध झालेली प्रत चर्चेत घेण्यात आली व पुढील ठराव क्रमांक २ संमत करण्यात आला.

१. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाशी राज्याचे उच्च शिक्षण मंत्री मा. श्री राजेश टोपे यांनी दि. २५ एप्रिल २०१२ रोजी व त्या नंतर २ मे २०१२ रोजी २ वेळा चर्चा केली. चर्चा झाल्यानंतर उभयपक्षी संमत व स्वाक्षरीत असे कार्यवृत्त अथवा मतैक्यपत्र तयार करणे हा या बाबत शिष्टसंमत मार्ग असल्याची बाब सन २००९मध्ये वारंवार लक्षात आणुन दिल्यानंतर सुद्धा चर्चेनंतर एकतर्फी पत्रे पाठविण्याचा सपाटा लावण्याच्या टाकावु मार्गाचा वापर त्या वेळी करण्यात आला होता. **संघटनेशी चर्चा करायची व त्या चर्चेचे आपल्याच कार्यालयात एकतर्फी कार्यवृत्त आपल्या सोईनुसार तयार करावयाचे व दुसऱ्या तिसऱ्या दिवशी ते संघटनेकडे पाठवावयाचे, या अतिटाकावु मार्गाचा वापर उच्च शिक्षण मंत्र्यांनी व त्याच्या विभागाने यावेळी अंगिकारल्याचे दिसून येत आहे.**

२. दि. २५ एप्रिल २०१२ रोजी झालेल्या चर्चेचे उच्च व तंत्र शिक्षण विभागात तयार करण्यात आलेले एकतर्फी कार्यवृत्त **(या पुढे याचा उल्लेख 'पहिले कार्यवृत्त' असा)** दोन तिन दिवसांनी कोणत्याही औपचारीक पत्राशिवाय संघटनेकडे पाठवुन देण्यात आले. हे दोन पृष्ठांचे असुन त्यातील प्रत्येक पृष्ठ उच्च शिक्षण सचिवांनी लघुस्वाक्षरीत केलेले आहे. दिनांक २ मे रोजी झालेल्या चर्चेचे उच्च शिक्षण विभागाने एकतर्फी तयार केलेले कार्यवृत्त **(यापुढे याचा उल्लेख 'दुसरे कार्यवृत्त' असा)** काल म्हणजे ९ मे २०१२ रोजी कक्ष अधिकाऱ्याच्या औपचारीक पत्रासह संघटनेकडे मुंबई येथे सोपविण्यात आले .आज प्राप्त झालेल्या कक्ष अधिकाऱ्याच्या औपचारीक पत्रासोबत दोन पृष्ठांचे कार्यवृत्त असुन त्यावर कोणाचीही स्वाक्षरी किंवा लघुस्वाक्षरी नाही. **दोन्ही कार्यवृत्ते उच्च शिक्षण विभागाने एकतर्फी तयार केलेली असुन ती उभय पक्षी स्वाक्षरीत झालेली नाहीत हे सुरुवातीलाच स्पष्ट करण्यात येत आहे.**

३. नेट-सेट बाबत पहिल्या कार्यवृत्तात "दि. १९ सप्टेंबर, १९९१ ते ३ एप्रिल २००० या कालावधीतील बिगर नेट-सेट अध्यापकांच्या संदर्भात विद्यापिठ अनुदान आयोगाने दि. १६/०८/२०११, २६/०८/२०११ व दि १५/०३/२०१२ च्या पत्रांन्वये दिलेले निदेश विचारात घेवुन सदर अध्यापकांच्या सेवा नियुक्तीच्या दिनांकापासुन ग्राह्य धरुन अनुषंगीक लाभ देण्याबाबत **वित्त विभागाची मान्यता घेतल्यानंतर** योग्य ते आदेश निर्गमित करण्यात येतील. सदर कार्यवाही लवकरात लवकर करण्यात येईल." असे नमुद करण्यात आले होते.

४. आता दुसऱ्या कार्यवृत्तात उच्च शिक्षण मंत्र्यांनी संपूर्णपणे पलटी मारली असून त्यात "दि. १९ सप्टेंबर, १९९१ ते ३ एप्रिल २००० या कालावधित बिगर नेट-सेट अध्यापकाच्या संदर्भात विद्यापिठ अनुदान आयोगाने दि. १६/०८/२०११, २६/०८/२०११ व दि १५/०३/२०१२ च्या पत्रांन्वये दिलेले निदेश विचारात घेवुन सदर अध्यापकांच्या सेवा नियुक्तीच्या दिनांका पासुन सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्याचे निदेश दिले आहेत. **या संदर्भात मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) व प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांची विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष डॉ. वेदप्रकाश यांचेशी दुरध्वनिवरुन चर्चा झाली. सदर चर्चेमध्ये डॉ. वेदप्रकाश यांनी, आयोगाने दिलेली सुट ही संबंधित विद्यापीठानी बिगर नेट-सेट अध्यापकांना नियमीत नेमणुक देते वेळी दिलेल्या सुटीच्या दिनांकापासुन देण्यात आल्याचे नमुद करुन अशा प्रकारे विद्यापीठांनी बिगर नेट-सेट अध्यापकांना नियमीत नेमणुक देते वेळी दिलेल्या सुटीच्या दिनांकापासुन सेवा नियमीत करुन सदर सेवा नियमीतीकरण हे सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरावयाचे असल्याचा निर्णय आयोगाने घेतलेला असल्याचा आयोगाच्या दि. १५/०३/२०१२ च्या पत्राचा अन्वयार्थ स्पष्ट केला. सदर बाब अशीच स्विकृत करावयाचे ठरले. तथापी हे मत आयोगाकडुन लेखी सहमतीत करुन घेण्याचेही बैठकीत ठरले.** त्या प्रमाणे आयोगास तात्काळ पत्र निर्गमित करावे. उपरोक्त कालावधीतील अध्यापकांच्या सेवा आयोगाकडुन वरील प्रमाणे सहमती प्राप्त होण्याच्या अधिन सर्व प्रयोजनार्थ नियमित नियुक्तीच्या दिनांकापासुन ग्राह्य धरण्याचे ठरले. या बाबतचा शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर उक्त

**दोन्ही कार्यवृत्तातील नेट-सेट बाबतच्या मजकुराचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता पहिल्या कार्यवृत्तातील वित्तविभागा विषयीचा वारंवार करण्यात आलेला उल्लेख उच्च शिक्षण विभागाच्या Disability चे प्रतिनिधित्व करतो तर दुसऱ्या कार्यवृत्तातील टेलीफोन वरील संभाषणाबाबतचा उल्लेख उच्च शिक्षण विभागाच्या Dishonesty चे प्रतिनीधित्व करतो.**

*आंदोलनाबाबतची महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची भूमिका स्पष्ट करणारा ठराव क्रमांक २ मधिल परिच्छेद ६ पहा*

अध्यापकांना दिनांक ११/१२/१९९९ व दि. १२/०८/२००९ रोजी च्या शासन निर्णयातील तरतुदी विचारात घेवुन त्यांची स्थाननिश्चिती व वेतननिश्चिती करण्यात यावी." असे नमुद करण्यात आले आहे.

५. वस्तूतः दि. २६ ऑगष्ट २००९ रोजी उभयपक्षी स्वाक्षरित झालेल्या मतैक्य पत्रात "नेट-सेट अर्हतेमधुन सुट देण्याचे व नियमित सेवा कधिपासुन ग्राह्य धरण्यात यावी, या बाबतचे सर्वोतोपरी अधिकार विद्यापीठ अनुदान आयोगास आहेत. या बाबत विद्यापीठ अनुदान आयोगाचा निर्णय अंतिम राहील." असे उभयपक्षी ठरले होते. यातील **"विद्यापीठ अनुदान आयोग" ही टेलिफोन वरुन ज्यांच्याशी बोलणी करावी अशी एक व्यक्ती नसुन विद्यापीठ अनुदान आयोग कायदा १९५६ या केंद्र शासनाच्या कायद्याच्या कलम ५ अन्वये एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष व दहा इतर सदस्य असे मिळुन केंद्र शासनाने नेमलेल्या राष्ट्रीय स्तरावरील तज्ञ अशा १२ लोकांचे आयोग हे एक विधिमय मंडळ [Body corporate] आहे.** आयोगाने निर्णय घ्यावा असे ठरले असतांना व आयोगाने आपल्या दिनांक ८ जुलै २०११ च्या बैठकीत विषय क्र.-२.०९अन्वये निर्णय घेतलेला असतांना व आयोगाचा तो निर्णय राज्य शासनाला दि. १६ ऑगस्ट २०११ च्या पत्रांन्वये व त्यानंतर २६ ऑगस्ट २०११ च्या पत्रान्वये कळविण्यात आला. त्यानंतर मा. उच्च शिक्षण मंत्र्याच्या लेखी आदेशाच्या विरोधात उच्च शिक्षण सचिवांनी विद्यापीठ अनुदान आयोगाला दि. २ डिसेंबर २०११ रोजी लेखी पत्र दिल्यावर सुद्धा विद्यापीठ अनुदान आयोगाने १५ मार्च २०१२ रोजी पत्र पाठवुन आपला निर्णय कायम ठेवला.

६. दोन्ही कार्यवृत्तातील नेट-सेट बाबतच्या मजकुराचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता **पहिल्या कार्यवृत्तातील वित्तविभागा विषयीचा वारंवार करण्यात आलेला उल्लेख उच्च शिक्षण विभागाच्या Disability चे प्रतिनिधित्व करतो तर दुसऱ्या कार्यवृत्तातील टेलीफोन वरील संभाषणाबाबतचा उल्लेख उच्च शिक्षण विभागाच्या Dishonesty चे प्रतिनीधित्व करतो.** उच्च शिक्षण विभागाने एक महिन्यात करावयाची कारवाई गेल्या आठ महिन्यात पार पाडली नाही हा नाकर्तेपणा झाकण्यासाठी टेलीफोन वरील बोलणे कार्यवृत्तात नमूद करणे व ते बोलणे पत्राने कन्फर्म करण्यासाठी वाट पाहत बसण्याचा जो मार्ग उच्च शिक्षण विभागाने निवडला आहे तो फारच निरर्थक असल्याने महासंघाला तो मान्य करता येत नाही. **आमचे या बाबतचे म्हणणे आज सकाळी संमत झालेल्या ठराव क्रं. १ च्या परिच्छेद १.२ ते १.९ मध्ये मांडलेले आहे.**

७. सुधारीत वेतनश्रेणीची थकबाकी अदा करण्याच्या संदर्भात दुसऱ्या कार्यवृत्ताचा परिच्छेद ४ पुढील प्रमाणे आहे. "सुधारीत वेतन आयोगानुसार अतिरीक्त खर्चाच्या ८० टक्के प्रतिपूर्ती करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्यात आला असुन सदर प्रस्ताव अद्याप मंजुर झालेला नाही. यासंदर्भात केंद्र शासनाकडे मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या स्तरावरुन पाठपुरावा करुन सदर रक्कम प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील व तद्नंतर पुढील निर्णय घेण्यात येईल."

दिनांक २६ ऑगष्ट २००९ रोजी उभयपक्षी स्वांक्षाकित झालेल्या कार्यवृत्तात याबाबत पुढील उल्लेख आहे. "केंद्र शासनाने पाठविलेल्या विद्यापीठीय व महाविद्यालयातील शिक्षकांच्या वेतन सुधारणा विषयाची समग्र योजना राज्य शासनाने विचारात घेऊन त्याबाबतचा शासननिर्णय दि. १२/०८/२००९ रोजी निर्गमित केला. या योजनेची अंमलबजावणी करतांना केंद्र शासनाकडून ८० टक्के अर्थसहाय्य मिळावे असे उद्दिष्ट राहिल. **हे अर्थसहाय्य केंद्र शासनाकडून न मिळाल्यास ८० टक्के थकबाकीची रक्कम राज्य शासन, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे देईल " या बाबतचे संघटनेचे म्हणणे आजच्या सकाळच्या सत्रातील ठराव क्रं. १ च्या परिच्छेद २.१ ते २.४ मध्ये तपशीलवारपणे मांडलेले आहे.**

८. दुसऱ्या कार्यवृत्ताचे काळजीपुर्वक अवलोकन करता यामध्ये राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांना गोवण्याचा प्रयत्न सुध्दा उच्च शिक्षण विभागाने केलेला आहे असे दिसुन येते. दि. २ मे २०१२ रोजी उच्च शिक्षण मंत्र्यांसोबत महासंघाच्या शिष्टमंडळाची बराच वेळ चर्चा झाल्यानंतर आपल्या सहकाऱ्यांसह उच्च शिक्षण मंत्री उठुन मुख्यमंत्र्याकडे गेलेत. एक दीड तासांनी संघटनेच्या शिष्टमंडळातील काही सदस्यांना मुख्यमंत्र्याच्या दालनामध्ये पाचारण करण्यात आले. **त्या नंतर जवळजवळ एक तासभर तेथे चर्चा झाली हे खरे असले तरी त्या चर्चेच्या शेवटी उभयपक्षी कोणतेही कार्यवृत्त स्वाक्षरीत झालेले नाही हे ठामपणे नमुद करण्यात येत आहे.**

९. दुसऱ्या कार्यवृत्तावर काळजीपुर्वक विचार केल्यानंतर हे कार्यकारी मंडळ या निष्कर्षाप्रत आले आहे की २६ ऑगस्ट २००९ च्या उभयपक्षी स्वाक्षरीत कार्यवृत्तामध्ये नेट-सेट बाबत व सहाव्या वेतन आयोगाच्या थकबाकीबाबत गेल्या ३२ महिन्यापूर्वी ठरल्याप्रमाणे कारवाई करण्यात उच्च शिक्षण मंत्र्यांना संपूर्णपणे अपयश आल्यामुळे या एकतर्फी कार्यवृत्ताच्या मार्फत आपले अपयश झाकण्याचा ते करीत असलेला प्रयत्न केविलवाणा असुन आयोगाने ८ जुलै २०११ च्या बैठकीत संमत केलेला ठराव न वाचता आयोगाशी टेलीफोन वरुन झालेल्या संभाषणाचा व संभाषण कन्फर्म होण्याची वाट पाहण्याचा दुसऱ्या कार्यवृत्तातील उल्लेख अतिकेविलवाणा प्रयत्न या सदरातच मोडतो.

१०. ३२ महिन्यापूर्वी शासनाच्या उच्च स्तरावरुन दिलेला शब्द अमंलबजावणीच्या प्रयोजनार्थ कागदोपत्री उतरविण्यात मा. उच्च शिक्षण मंत्र्यांना येत असलेल्या अडचणी लक्षात घेता मा. मुख्यमंत्र्यांनी व उपमुख्यमंत्र्यानी उच्च शिक्षण मंत्र्यासमवेत उच्चस्तरीय बैठक बोलावुन विषयोक्त मुद्यांवर निर्णय करावेत व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळावे अशी विनंती करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

११. उच्च शिक्षण खात्याकडून या बाबतीत होत असलेला विलंब लक्षात घेता आंदोलन आणखी तीव्र करण्याचा भाग म्हणुन राज्यभर संघटनेतर्फे विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या सभांचे आयोजन करुन त्यांना हा विषय जाहिरपणे समजवुन सांगण्याच्या कार्यक्रमाला पुढील आठवड्यापासुन सुरुवात केली जाईल असाही निर्णय घेण्यात येत आहे.

**प्रा. शिवाजीराव पाटील**
अध्यक्ष

**प्रा.डॉ. एस. पी. लवांडे**
सहसचिव

***संघटनेशी चर्चा करायची व त्या चर्चेचे आपल्याच कार्यालयात एकतर्फी कार्यवृत्त आपल्या सोईनुसार तयार करावयाचे व दुसऱ्या तिसऱ्या दिवशी ते संघटनेकडे पाठवावयाचे, या अति टाकावु मार्गाचा वापर उच्च शिक्षण मंत्र्यांनी व त्याच्या विभागाने यावेळी अंगिकारल्याचे दिसून येत आहे.***

*आंदोलनाबाबतची महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची भूमिका स्पष्ट करणारा ठराव क्रमांक २ मधिल परिच्छेद १ पहा*

*अशासकीय अनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वेतन फरकाच्या व इतर देय रक्कमा अदा करण्याबाबत*

## महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्रशिक्षण विभाग : मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२

### *शासन निर्णय क्र. बैठक-२०११/(२६४/११)/मशि-३ : दिनांक : १९ एप्रिल, २०१२*

***प्रस्तावना*** :- उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीत येणाऱ्या अशासकीय अनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना ६ व्या वेतन आयोगानुसार देय असलेल्या राज्य शासनाच्या हिश्याच्या रक्कमा, सन २०११-१२ या आर्थिक वर्षामध्ये लागू करण्यात आलेल्या ६ टक्के आणि ७ टक्के महागाई भत्त्याच्या फरकाची रक्कम तसेच, अशासकीय अनुदानित महाविद्यालयात तासिका तत्वावर काम करीत असलेल्या अध्यापकांचे थकीत मानधन संबंधित कर्मचाऱ्यांना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

***शासन निर्णय*** :- अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना खालील विवरणपत्रामध्ये दर्शविल्यानुसार ६ व्या वेतन आयोगानुसार देय असलेल्या राज्य शासनाच्या हिश्याची रक्कम, सन २०११-१२ या आर्थिक वर्षामध्ये लागू करण्यात आलेल्या ६ टक्के आणि ७ टक्के महागाई भत्याच्या फरकाची रक्कम तसेच, अशासकीय अनुदानीत महाविद्यालयात तासिका तत्वावर काम करीत असलेल्या अध्यापकांचे थकीत मानधन अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

रुपये कोटीत

| अ.क्र. | तपशील | अशासकीय अनुदानीत महाविद्यालये (कला, वाणिज्य, विज्ञान व विधी) | अनुदानीत अध्यापक महाविद्यालये |
|---|---|---|---|
| १. | २० टक्के नुसार जीपीएफ मध्ये जमा करावयाच्या रकमा (शिक्षक)<br>(अ) पहिला व दुसऱ्या हप्त्यातील देणे बाकी रक्कम<br>(ब) तिसरा हप्ता | <br>२१.४३<br>४८.२१ | <br>१.४५<br>०.७२ |
| २ | २० टक्के नुसार जीपीएफ जमा करायची रक्कम (शिक्षकेत्तर)<br>(अ) पहिला व दुसऱ्या हप्त्यातील देणे बाकी रक्कम<br>(ब) तिसऱ्या हप्त्याची रक्कम | <br>०.००<br>५०.५६ | <br>०.२१<br>०.०० |
| ३. | शिक्षकांना दि. १.४.२००९ते दि. ३१.१.२०१० या कालावधीत रोखीने देय रक्कम. एकूण खर्च रु. ५२२.४० कोटी, त्यातील रु. १०४.४८ कोटी (२० टक्के) राज्य शासनाकडून देय आहे. त्यापैकी माहे फेब्रुवारी आणि मार्च २०१० या कालावधीतील वेतन फरकाची रक्कम रोखीने देण्यासाठी शासनाने रु. ८७.०६ कोटी एवढी रक्कम यापूर्वीच अदा केली असून राज्य शासनाच्या हिश्याची उर्वरीत रक्कम या आदेशाव्दारे देण्यात येत आहे. | १७.४२ | ०.०० |
| ५. | दि. १.५.२०११ पासून दि. ३०.९.२०११ पर्यंत ६ टक्के महागाई भत्याच्या वाढीची रक्कम (माहे ऑक्टोबर २०११ ते मार्च २०१२ या कालावधीतील रक्कम अदा करण्यात आली असून उर्वरीत माहे मे ते सप्टेंबर २०११ या कालावधीतील रक्कम या आदेशाव्दारे देण्यात येत आहे.) | ३८.४० | ०.०० |
| ६. | माहे ऑक्टो.२०११ ते फेब्रु.२०१२ या कालावधीतील ७ टक्के महागाई भत्याची रक्कम | ४४.८१ | ०.०० |
| ७. | अशासकीय अनुदानित महाविद्यालयात तासिका तत्वावर कार्यरत असलेल्या अध्यापकांचे मानधन अदा करणे | ३१.३४ | ०.०० |
| | एकूण | २५२.१७ | २.३८ |

वरील विवरणपत्रामध्ये दर्शविल्यानुसार अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान व विधी महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांसाठी सहाय्यक अनुदान (वेतन) यासाठी सन २०१२-१३ या आर्थिक वर्षामध्ये उपलब्ध असलेल्या अर्थसंकल्पिय तरतुदीमधून रु. २५२.१७ कोटी (दोनशे बावन्न कोटी सतरा लाख फक्त) तसेच, अशासकीय अनुदानीत अध्यापक महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांसाठी सहाय्यक अनुदान (वेतन) यासाठी सन २०१२-१३ या आर्थिक वर्षामध्ये उपलब्ध असलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीमधून रु. २.३८ कोटी (दोन कोटी अडोतीस लाख फक्त) एवढ्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ३०२/१२/व्यय-५, दि. १८.४.२०१२ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(ग.स.कचरे)**

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/078/2012-14 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **15.05.2012**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 602**.

---

To,..............................................................

.....................................................................

.....................................................................

.....................................................................

.....................................................................